रजिस्ट्री सं. डी. 281

Price : Rs. 5.00
REGISTERED No. D-221
नोंदणी क्रमांक डी-221

# भारत का राजपत्र
# The Gazette of India
# भारताचे राजपत्र

असाधारण
EXTRAORDINARY
असाधारण

भाग 12 अनुभाग 1
Part XII Section 1
भाग बारा अनुभाग 1

प्राधिकार से प्रकाशित
PUBLISHED BY AUTHORITY
प्राधिकाराद्वारे प्रकाशित

| | | |
|---|---|---|
| सं. 1 ] | नई दिल्ली, फरवरी 20–26, 2025/फाल्गुन 1-7 (शक) 1946 | [खंड 22 |
| No. 1 ] | NEW DELHI, FEBRUARY 20-26/PHALGUNA 1-7 (SAKA) 1946 | [Vol. 22 |
| अं. १ ] | नवी दिल्ली, फेब्रुवारी २०-२६, २०२५/फाल्गुन १-७ (शके) १९४६ | [खंड २२ |

स्वतंत्र संकलन म्हणून फाईल करण्यासाठी या भागाला वेगळे पृष्ठ क्रमांक दिले आहेत.

## विधि और न्याय मंत्रालय

(विधायी विभाग)

नई दिल्ली,

(1) दि मेइन्टिनन्स् ऑर्डर्स् एन्फोर्समेन्ट ॲक्ट, 1921 ; (2) दि कलेक्शन् ऑफ स्टेटिस्टिक्स ॲक्ट, 2008 ; (3) दि सेन्ट्रल एज्युकेशनल इन्स्टिट्युशन्स् (रिझर्वेशन् इन टिचर्स काडर) ॲक्ट, 2019 ; (4) दि मुस्लिम वुमेन (प्रोटेक्शन् ऑफ राइटस् ऑन मॅरेज) ॲक्ट, 2019 के मराठी अनुवाद राष्ट्रपती के प्राधिकार से प्रकाशित किये जाते है और ये प्राधिकृत पाठ (केंद्रीय विधि) अधिनियम, 1973 (1973 का 50) की धारा 2 के खण्ड (क) के अधीन उनके मराठी प्राधिकृत पाठ समझे जायेंगे।

## MINISTRY OF LAW AND JUSTICE

(LEGISLATIVE DEPARTMENT)

New Delhi,

The Translation in Marathi of (1) The Maintenance Orders Enforcement Act, 1921 ; (2) The Collection of Statistics Act, 2008 ; (3) The Central Educational Institutions (Reservation in Teachers' Cadre) Act, 2019 ; (4) The Muslim Women (Protection of Rights on Marriage) Act, 2019 are hereby published under the authority of the President and shall be deemed to be the authoritative texts thereof in Marathi under clause (*a*) of Section 2 of the Authoritative Texts (Central Laws) Act, 1973 (50 of 1973).

## विधि व न्याय मंत्रालय

(विधायी विभाग)

नवी दिल्ली,

(१) दि मेइन्टिनन्स् ऑर्डर्स् एन्फोर्समेन्ट ॲक्ट, १९२१ ; (२) दि कलेक्शन् ऑफ स्टेटिस्टिक्स ॲक्ट, २००८ ; (३) दि सेन्ट्रल एज्युकेशनल इन्स्टिट्युशन्स् (रिझर्वेशन इन टिचर्स काडर) ॲक्ट, २०१९ ; (४) दि मुस्लिम वुमेन (प्रोटेक्शन ऑफ राइटस् ऑन मॅरेज) ॲक्ट, २०१९ यांचा मराठी अनुवाद याद्वारे, राष्ट्रपतीच्या प्राधिकारान्वये प्रसिद्ध करण्यात येत आहे आणि तो, प्राधिकृत पाठ (केंद्रीय विधि) अधिनियम, १९७३ (१९७३ चा ५०) याच्या कलम २ च्या खंड (क) अन्वये मराठीतील त्यांचा प्राधिकृत पाठ असल्याचे मानण्यात येईल.

## निर्देशसूची
## INDEX


| अनुक्रमांक Serial No. (१) | अधिनियमाचे नाव Name of the Act (२) | पृष्ठ क्रमांक Page No. (३) |
|---|---|---|
| १ | निर्वाह आदेशांची अंमलबजावणी अधिनियम, १९२१<br>The Maintenance Orders Enforcement Act, 1921 | ५ |
| २ | आकडेवारी संग्रहण अधिनियम, २००८<br>The Collection of Statistics Act, 2008 | ११ |
| ३ | केंद्रीय शैक्षणिक संस्था (अध्यापक संवर्गातील आरक्षण) अधिनियम, २०१९<br>The Central Educational Institutions (Reservation in Teachers' Cadre) Act, 2019 | २१ |
| ४ | मुस्लिम महिला (वैवाहिक हक्कांचे संरक्षण) अधिनियम, २०१९<br>The Muslim Women (Protection of Rights on Marriage) Act, 2019 | २५ |

## केंद्रीय शैक्षणिक संस्था (अध्यापक संवर्गातील आरक्षण) अधिनियम, २०१९

**(२०१९ चा अधिनियम क्रमांक १०)**

(१ ऑगस्ट, २०२३ रोजी यथाविद्यमान)

**[९ जुलै, २०१९]**

**केंद्र सरकारने स्थापन केलेल्या, चालवलेल्या किंवा अनुदान दिलेल्या विवक्षित केंद्रीय शैक्षणिक संस्थांमधील अध्यापक संवर्गासाठी, अनुसूचित जाती, अनुसूचित जनजाती, सामाजिक व शैक्षणिकदृष्ट्या मागासवर्ग आणि आर्थिकदृष्ट्या दुर्बल वर्ग यांतील व्यक्तींची, सरळसेवा भरतीद्वारे नियुक्ती करताना, पदे आरक्षित ठेवण्यासाठी आणि त्यांच्याशी संबंधित किंवा तदानुषंगिक बाबींसाठी तरतूद करण्याकरिता अधिनियम.**

तो, भारतीय गणराज्याच्या सत्तराव्या वर्षी, संसदेकडून, पुढीलप्रमाणे अधिनियमित होवो :—

**१.** (१) या अधिनियमास, केंद्रीय शैक्षणिक संस्था (अध्यापक संवर्गातील आरक्षण) अधिनियम, २०१९, असे म्हणावे. **संक्षिप्त नाव व प्रारंभ.**

(२) तो, दिनांक ७ मार्च, २०१९ रोजी अंमलात आला असल्याचे मानण्यात येईल.

**२.** या अधिनियमात, संदर्भानुसार दुसरा अर्थ आवश्यक नसेल तर,— **व्याख्या.**

१९५६ चा ३. (क) " समुचित प्राधिकरण " याचा अर्थ, विद्यापीठ अनुदान आयोग अधिनियम, १९५६ अन्वये स्थापन केलेला विद्यापीठ अनुदान आयोग, किंवा कोणत्याही केंद्रीय शैक्षणिक संस्थेमधील उच्च शिक्षणाचा दर्जा निर्धारित करण्यासाठी, समन्वय साधण्यासाठी किंवा परिरक्षण करण्यासाठी एखाद्या केंद्रीय अधिनियमाद्वारे किंवा त्यान्वये स्थापन केलेले इतर कोणतेही प्राधिकरण किंवा निकाय, असा आहे ;

(ख) " अभ्यास शाखा " याचा अर्थ, स्नातक (पदवीपूर्व), स्नातकोत्तर (पदव्युत्तर) आणि विद्यावाचस्पती (डॉक्टरेट) या अर्हतांच्या प्रमुख तीन स्तरांवरील शिक्षण देणारी एक अभ्यास शाखा, असा आहे ;

(ग) " केंद्रीय शैक्षणिक संस्था " याचा अर्थ,—

(एक) केंद्रीय अधिनियमाद्वारे किंवा त्यान्वये स्थापन केलेले किंवा विधिसंस्थापित केलेले विद्यापीठ ;

(दोन) संसदेच्या अधिनियमाद्वारे स्थापन केलेली राष्ट्रीयदृष्ट्या महत्त्वाची एखादी संस्था ;

१९५६ चा ३. (तीन) विद्यापीठ अनुदान आयोग अधिनियम, १९५६ याच्या कलम ३ अन्वये अभिमत विद्यापीठ म्हणून घोषित केलेली आणि केंद्र सरकारकडून चालविलेली किंवा अनुदान मिळणारी संस्था ;

(चार) केंद्र सरकारकडून चालविलेली किंवा अनुदान मिळत असणारी- मग ते प्रत्यक्षपणे असो किंवा अप्रत्यक्षपणे असो,- आणि उप-खंड (एक) किंवा उप-खंड (दोन) मध्ये निर्दिष्ट केलेल्या एखाद्या संस्थेशी संलग्न असलेली, किंवा उप-खंड (तीन) मध्ये निर्दिष्ट केलेल्या एखाद्या संस्थेची घटक शाखा असलेली संस्था ; आणि

१८६० चा २१. (पाच) सोसायटी नोंदणी अधिनियम, १८६० अन्वये केंद्र सरकारने, स्थापन केलेली शैक्षणिक संस्था, असा आहे ;

(घ) " सरळसेवा भरती " याचा अर्थ, एखाद्या केंद्रीय शैक्षणिक संस्थेत अध्यापन करण्यासाठी पात्र असलेल्या व्यक्तींकडून, सार्वजनिक जाहिरातीद्वारे अर्ज मागवून, त्याद्वारे अध्यापक म्हणून नियुक्ती करण्याची प्रक्रिया, असा आहे ;

(ङ) " आर्थिकदृष्ट्या दुर्बल वर्ग " याचा अर्थ, संविधानाच्या अनुच्छेद १५ च्या खंड (६) च्या स्पष्टीकरणात निर्दिष्ट केलेले दुर्बल वर्ग, असा आहे ;

(च) " अध्यापक " याचा अर्थ, एखाद्या केंद्रीय शैक्षणिक संस्थेचा अध्यापक, असा आहे ;

(छ) " अल्पसंख्याक शैक्षणिक संस्था " याचा अर्थ, संविधानाच्या अनुच्छेद ३० च्या खंड (१) अन्वये, अल्पसंख्याक वर्गाने स्थापन केलेली व त्याच्याकडून प्रशासन केलेली आणि संसदेच्या अधिनियमाद्वारे किंवा केंद्र सरकारकडून तशी घोषित केलेली किंवा राष्ट्रीय अल्पसंख्याक शैक्षणिक संस्था आयोग अधिनियम, २००४ अन्वये, अल्पसंख्याक शैक्षणिक संस्था म्हणून घोषित केलेली, एखादी संस्था, असा आहे ; २००५ चा २.

(ज) " मंजूर संख्या " याचा अर्थ, समुचित प्राधिकरणाने मान्यता दिलेली, अध्यापक संवर्गातील पदसंख्या, असा आहे ;

(झ) " अनुसूचित जाती " याचा अर्थ, संविधानाच्या अनुच्छेद ३४१ अन्वये अधिसूचित केलेल्या अनुसूचित जाती, असा आहे ;

(ञ) " अनुसूचित जनजाती " याचा अर्थ, संविधानाच्या अनुच्छेद ३४२ अन्वये अधिसूचित केलेल्या अनुसूचित जमाती, असा आहे ;

(ट) " सामाजिक व शैक्षणिकदृष्ट्या मागासवर्ग " याचा अर्थ, संविधानाच्या अनुच्छेद ३४२ क अन्वये तसे मानलेले आहेत, असे मागासवर्ग, असा आहे ;

(ठ) " अध्यापक संवर्ग " याचा अर्थ, अभ्यास शाखा किंवा विद्याशाखा यांचा विचार न करता, ज्यांना कोणताही भत्ता किंवा बोनस वगळून, समान वेतन श्रेणीतील पारिश्रमिक दिले जाते अशा, एखाद्या केंद्रीय शैक्षणिक संस्थेच्या सर्व अध्यापकांचा वर्ग, असा आहे.

**केंद्रीय शैक्षणिक संस्थांच्या भरतीमध्ये पदांचे आरक्षण.**

**३.** (१) त्या त्या वेळी अंमलात असलेल्या इतर कोणत्याही कायद्यामध्ये काहीही अंतर्भूत असले तरी, **राजपत्रातील** अधिसूचनेद्वारे केंद्र सरकारकडून विनिर्दिष्ट करण्यात येईल अशा मर्यादेत व रीतीने, एखाद्या केंद्रीय शैक्षणिक संस्थेमधील अध्यापक संवर्गातील मंजूर संख्येपैकी सरळसेवा भरतीमध्ये पदांचे आरक्षण असेल.

(२) पदांच्या आरक्षणाच्या प्रयोजनार्थ, केंद्रीय शैक्षणिक संस्था ही एकच युनिट असल्याचे समजण्यात येईल.

**विवक्षित प्रकरणी अधिनियम लागू नसणे.**

**४.** (१) कलम ३ च्या तरतुदी पुढील संस्थांना लागू असणार नाहीत :—

(क) या अधिनियमाच्या अनुसूचीमध्ये विनिर्दिष्ट केलेल्या सर्वोत्कृष्ट संस्था, संशोधन संस्था, राष्ट्रीय व धोरणात्मकदृष्ट्या महत्त्वाच्या संस्था ;

(ख) अल्पसंख्याक शैक्षणिक संस्था.

(२) केंद्र सरकारला **राजपत्रातील** अधिसूचनेद्वारे, पोट-कलम (१) च्या खंड (क) मध्ये निर्दिष्ट केलेल्या अनुसूचीत, वेळोवेळी सुधारणा करता येईल.

**अधिसूचना संसदेसमोर मांडणे.**

**५.** या अधिनियमान्वये केंद्र सरकारने काढलेली प्रत्येक अधिसूचना, ती काढण्यात आल्यानंतर, शक्य तितक्या लवकर, संसदेच्या प्रत्येक सभागृहापुढे, एकाच सत्रात, अथवा दोन किंवा अधिक क्रमवर्ती सत्रांत मिळून एकूण तीस दिवसांचा होईल इतक्या कालावधीकरिता, ते सत्रासीन असताना, ठेवण्यात येईल, आणि जर पूर्वोक्त सत्राच्या किंवा क्रमवर्ती सत्रांच्या लागोपाठचे सत्र समाप्त होण्यापूर्वी, त्या अधिसूचनेत कोणताही फेरबदल करण्याबाबत दोन्ही सभागृहांचे मतैक्य झाले, किंवा ती अधिसूचना काढण्यात येऊ नये, याबाबत दोन्ही सभागृहांचे मतैक्य झाले तर, त्यानंतर ती अधिसूचना केवळ अशा फेरबदल केलेल्या स्वरूपातच अंमलात येईल, किंवा, यथास्थिति, मुळीच अंमलात येणार नाही. तथापि, अशा कोणत्याही फेरबदलामुळे किंवा विलोपनामुळे त्या अधिसूचनेअन्वये पूर्वी केलेल्या कोणत्याही गोष्टीच्या विधिग्राह्यतेस बाधा येणार नाही.

**निरसन व व्यावृत्ती.**

**६.** (१) केंद्रीय शैक्षणिक संस्था (अध्यापक संवर्गातील आरक्षण) अध्यादेश, २०१९ याद्वारे निरसित केला आहे. २०१९ चा १३.

(२) असे निरसन झाले असले तरी, उक्त अध्यादेशान्वये केलेली कोणतीही गोष्ट किंवा हाती घेतलेली कोणतीही कारवाई ही, या अधिनियमान्वये करण्यात आलेली गोष्ट किंवा हाती घेण्यात आलेली कारवाई असल्याचे मानण्यात येईल.

## अनुसूची

**[कलम ४(१) (क) पहा]**

| अ.क्र. | सर्वोत्कृष्ट संस्था, इत्यादीचे नाव |
|---|---|
| (१) | (२) |
| १. | होमी भाभा राष्ट्रीय संस्था, मुंबई आणि तिच्या घटक संस्था जसे :— |
| | (एक) भाभा अणु संशोधन केंद्र, ट्रॉम्बे ; |
| | (दोन) इंदिरा गांधी अणु संशोधन केंद्र, कलपक्कम ; |
| | (तीन) राजा रामण्णा प्रगत तंत्रज्ञान केंद्र, इंदोर ; |
| | (चार) प्लाझ्मा संशोधन संस्था, गांधीनगर ; |
| | (पाच) परिवर्ती ऊर्जा साइक्लोट्रॉन केंद्र, कोलकाता ; |
| | (सहा) साहा अणुकेंद्रीय भौतिकी संस्था, कोलकाता ; |
| | (सात) भौतिकी संस्था, भुवनेश्वर ; |
| | (आठ) गणित विज्ञान संस्था, चेन्नई ; |
| | (नऊ) हरिश-चंद्र संशोधन संस्था, अलाहाबाद ; |
| | (दहा) टाटा मेमोरियल केंद्र, मुंबई. |
| २. | टाटा मूलभूत संशोधन संस्था, मुंबई. |
| ३. | उत्तर-पूर्वीय इंदिरा गांधी प्रादेशिक आरोग्य व वैद्यकीय विज्ञान संस्था, शिलाँग. |
| ४. | नॅशनल ब्रेन रिसर्च सेंटर, मानेसर, गुरगाव. |
| ५. | जवाहरलाल नेहरू प्रगत वैज्ञानिक संशोधन केंद्र, बंगलोर. |
| ६. | भौतिक संशोधन प्रयोगशाळा, अहमदाबाद. |
| ७. | अवकाश भौतिकशास्त्र प्रयोगशाळा, थिरूवअनंतपूरम. |
| ८. | भारतीय दूरसंवेदन संस्था, डेहराडून. |